

Chetana- New Arts, Commerce and Science College, Parner-414 302, MS






प्रशासकीय इमारत

Chetana-  New Arts, Commerce and Science College, Parner-414 302, MS





आमची प्रकाशने...
UGC Sponsored
International Conference on
"Environmental Issues and Sustainable Development"
PROCEEDING
Conferece Proceeding
National Seminar on
Impact of Foreign Direct
Economy

Chetana- New Arts, Commerce and Science College, Parner-414 302, MS




सन २०१३-१४ मध्ये महाविद्यालयास मिळालेले पुरस्कार
पुणे विद्यापीठ उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार
विद्यार्थी कल्याण मंडळ उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार
चेतना पुरस्कार
कन्यारत्न अभियान पुरस्कार
रस्ता सुरक्षा पुरस्कार
जागर जाणिवांचा पुरस्कार
सर्वोत्कृष्ट वि.क. अधिकारी पुरस्कार
पारनेर गौरव पुरस्कार
राष्ट्रीय सेवा योजना पुरस्कार

Chetana- New Arts, Commerce and Science College, Parner-414 302, MS




# शपथ


भारत माझा देश आहे.
सारे भारतीय माझे बांधव आहेत.
माझ्या या देशात, स्त्री-पुरुष समानता नांदावी,
यासाठी मी सदैव प्रयत्न करेन.
स्त्री ही महान शक्ती आहे.
ती अनंत काळाची माता आहे.
मुलगा वंशाचा दिवा असेल तर,
मुलगी वंशाची पणती आहे.
तिचा आदर सन्मान मनापासून करणे
हे माझे कर्तव्य आहे.
मी हुंडा देणार नाही, घेणार नाही
स्त्रीभ्रूणहत्या मी करणार नाही.
करु देणार नाही.
मी स्त्री जन्माचे स्वागत करेन.
त्याविषयी जनजागृती करेन.
अशी शपथ मी आज सर्वांच्या साक्षीने घेत आहे.
भारत माता की जय!
वंदे मातरम्!



डॉ. सुधा कांकरिया
अहमदनगर

Chetana- New Arts, Commerce and Science College, Parner-414 302, MS





## सेनापती बापट

### माझा हरी निराकार

प्राथमिक विद्यादान करा सर्वही झटून।
शक्य जें जें विद्यादान करा सर्वही झडून।
प्राथमिक विद्यासंघ काढा काढा हो सुरंग।
पारनेर तालुक्याचा भार उचला विद्येचा।।
वाड्या खेडीं सानथोर नको कोठेंही अंधार
हेंचि इष्ट धरा मनी करा प्रयत्न झटूनी।
पहा पश्चिमेचे लोक त्यांना विद्येचें कौतुक।
लाखा कोटींनी जे धन विद्येसाठीं देती दान।
ऐसें धन जनमवोनी शाळा स्थापिती झटूनी।।
पहा जपानचे लोक त्यांना विद्येचें कौतुक
तेथें विद्या घरोघर त्यांचा सुंदर संसार।
देशसंसार सुंदर विद्यायोगेंच होणार।
जेथें विद्या थोड्या घरीं तया देशा कैशी थोरी।
थोर अंकाक्षर विद्या घरोघरीं ती शिकू द्या
थोर अंकाक्षर विद्या मुलामुलींना शिकू द्या
अन्य कलांबरोबर होऊं द्या ही घरोघर।।
सर्व विश्वासी जोडाया मित्रभाव वाढवावा।
हीच विद्या हो शेवटीं कामीं येईल गोमटी।
याच विद्येच्या बळानें ज्ञान वाढतें वेगानें।
शीघ्र प्रसार ज्ञानाचा हाहि महिमा तियेचा।
पहा ज्ञानवीण नाही श्रेष्ठ मुक्ति कोणासही।
श्रेष्ठ मुक्तींचें साधन ज्ञान आणि थोर मन।
तुम्ही मन थोर करा विद्या बोलवा ही घरा।
जन्मोजन्मीं हेंचि करा हेंचि गोड रमावरा।
तुम्ही मन करा थोर विद्या धाडा घरोघर।।
विद्या दान करायासी धान जमवा सायासी।
वाटा थोडासा प्राप्तीचा करा निश्चय देण्याचा।
लग्न, मुंजी, व्रतें, नेम आदीक ते धर्मकर्म।
त्या त्या कर्मांचिया नांवें विद्येसाठीं दान व्हावें।
भिक्षा विद्येचिया नांवें मूठपसा घाला भावें।
येणें रीतिं धनबळ जोडा सज्जन सकळ।
पारनेर तालुक्याचा भार उचला विद्येचा।।
अहो विद्यावंत लोक करा विद्येचे कौतुक।
घ्यावा बेताचा पगार व्हावें विद्येचें चाकर।
वाड्याखेड्यामध्ये जावे विद्यादानार्थ रहावे।
विद्यादान पुण्य थोर व्हावे विद्येचे चाकर।
व्हावी विद्या घरोघर हेंचि इष्ट असे थोर।
हेंचि इष्ट मनीं धरा लागा देशाच्या संसारा।।

सेनापती बापट यांच्या 'माझा हरी निराकार', या कवितेतून...